**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

## ➢ शहरातील आजारी प्राणी व पशूंनसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत पशुवैद्यकीय विभागाची नव्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण (मोबाईल वॅन)

मिरा भाईंदर महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागातर्फे शहरातील आजारी प्राणी व पशूंसाठी उत्तम सेवा देणारी नवी रुग्णवाहिका दाखल झाली आहे. शहरातील आजारी प्राणी आणि पशूंनवर जागेवर जाऊन उपचार करण्यासाठी महत्वाची ठरणारी या नव्या प्राणी रुग्णवाहिकेचे (मोबाईल वॅन)दि. 18 नोव्हेंबर 2025 रोजी लोकार्पण मिरा भाईदर महानगरपालिका मुख्यालयात मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.) यांच्या हस्ते ल करण्यात आले. शहरातील आजारी प्राणी व पशुवर त्या ठिकाणी जाऊन जागेवर औषध उपचार करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.

शहरात अनेकदा आजारी प्राणी व पशूंच्या उपचाराबाबत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन महानगरपालिकेने ही सेवा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेमुळे मिरा भाईंदर शहरातील पशूसंवर्धन व प्राणी कल्याण कार्याला नवे बळ मिळणार असून शहरातील आजारी प्राण्यांना अधिक जलद सेवा देता येणार आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना व पशु प्रेमींना कुठेही आजारी/ जखमी प्राणी किंवा पशू आढळल्यास पशु वैद्यकीय रुग्णवाहिका (मोबाईल वॅन) 7208070806 या क्रमांकावर सकाळी 10 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत संपर्क साधावा

या रुग्णवाहिकेच्या लोकार्पणच्या वेळी अतिरिक्त आयुक्त श्रीम. प्रियांका राजपूत, उपायुक्त (मुख्यालय) डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विक्रम निराटले,माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत, सहाय्यक आयुक्त जितेंद्र कांबळे, नगरसचिव दिनेश कानगुडे तसेच मनपाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**(डॉ. विक्रम निराटले)**
**पशुवैद्यकीय अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**